SANT GADGE BABA AMRAVATI UNIVERSITY GAZETTE

Official Publication of Sant Gadge Baba Amravati University

PART- TWO

गुरूवार, दिनांक २७ नोव्हेंबर, २०२५

अधिसूचना

क्रमांक : २२६/२०२५ दि. २७/११/२०२५

विषय :- कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ
श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२५

सर्व सामान्यांच्या माहिती करीता कळविण्यात येते की, विनियम क्र. २४/२००२, नुसार व सुधारित विनियम क्र. ०४/२००६, विनियम क्र. ०४/२००९, विनियम क्र. ०६/२०२१, विनियम क्र. ३९/२०२५, नुसार माजी आमदार स्व. द.ना. उपाख्य बबनराव मेटकर यांच्याकडून प्राप्त झालेल्या दाननिधीमधून सुरू करण्यात आलेल्या **कै.नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२५** साठी **व्यक्ती गटामधून श्री. मनिष रमेशराव पावडे, अमरावती, व संस्था गटामधून दिव्या_फाऊंडेशन, वरवंड जि. बुलढाणा** यांची पुरस्कार निवड समितीने एकमताने निवड केली आहे.

संत गाडगेबाबांच्या दशसूत्रीनुसार सामाजिक कार्य करणारी **संस्था गट व व्यक्ती गट असे दोन पुरस्कार (एकूण दोन) सन २०२५ पासून देण्याबाबत विनियमानुसार दुरूस्ती करण्यात आली आहे. त्यानुसार व्यक्ती गटामधून सामाजिक कार्यकर्ता श्री. मनिष रमेशराव पावडे, अमरावती, व संस्था गटामधून दिव्या फाऊंडेशन, वरवंड जि. बुलढाणा** या संस्थेने अनेक समाजोपयोगी कार्य केले असून सामाजिक कार्यासाठी ही संस्था सतत कार्यरत असते. **दिव्या फाऊंडेशन,** या संस्थेला व **श्री. मनिष रमेशराव पावडे,** यांना संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठाचा **'कै. नागोरावजी जयरामजी मेटकर स्मृतिप्रित्यर्थ श्री संत गाडगे बाबा सामाजिक कार्य पुरस्कार- २०२५'** घोषित करण्यात आला आहे.

स्वा/-
(डॉ. अविनाश असनारे)
कुलसचिव
संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठ